## नि.दि.दा.क्र. ६२/२०१५ मधील नि.क्र. ८२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने अतिरिक्त मुद्दा काढणेसाठी दाखल केलेला आहे. वादीने सदर अर्जावर म्हणणे देवून अर्जास विरोध दर्शविला आहे.

२. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, वादीने त्याच्या दाव्यात परिच्छेद क्र. ५ व ८ मध्ये तो कै. महिपत यांच्या दि. १५/१०/१९९० च्या तथाकथित मृत्यूपत्राने दावा मिळकतीचा मालक आहे असे कथन केले असून प्रतिवादींनी नि. २४ येथे कैफियत दाखल करुन कै. महिपत यांनी आपल्या हयातीत कधीही वादीचे नाव दावा मिळकतीसंबंधी कोणतेही मृत्यूपत्र केलेले नाही असे कथन करुन वादीचा दावा नाकारला आहे. दाव्यात नि. ३२ येथे मुद्दे काढण्यात आलेले असून सदर मुद्दयामध्ये मृत्यूपत्राबाबत कोणताही मुद्दा काढलेला नाही. त्यामुळे सदरच्या मृत्यूपत्राबाबत खालील अतिरिक्त मुद्दा काढणे आवश्यक आहे.

१. Whether plaintiff proves that deceased Mahipat Yesu Rane in his life time has executed a Will dated 15/10/1990 in favour of plaintiff relating to suit property ?

तरी वरीलप्रमाणे अतिरिक्त मुद्दे काढणेची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३. वादीने अर्जास प्रखर हरकत नोंदवून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादीने दाखल केलेला दावा, प्रतिवादी क्र. १ ने दाखल केलेली नि. २४ येथील कैफियत व नि. ३२ येथे काढण्यात आलेले मुद्दे यांचे अवलोकन केले. वादीने तो महिपत याच्या मृत्यूपत्रानुसार दावा मिळकती माल म्हणून दावा मिळकतीचा उपभोग घेत असल्याचे कथन करुन प्रतिवादींनी त्याच्या दावा मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून

प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादींनी आपल्या कैफियतीमध्ये त्यांचे आजोबा कै. महिपत यांनी त्यांच्या हयातीत वादीचे नाव कोणतेही मृत्यूप केलेले नव्हते अगर नाही असा बचाव घेतला आहे. परंतु नि. ३२ येथील माझे पुर्वाधिकारी यांनी काढलेले मुद्दे पाहता सदरच्या मृत्यूपत्राबाबत मुद्दा काढण्यात आलेला नाही असे दिसून येते. परंतु नि. ३२ येथील मुद्यांचे अवलोकन करता प्रतिवादींच्या कथनानुसार प्रतिवादींनी अर्जात नमूद केलेले मुद्दे काढण्यात आलेले नाहीत. वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचे समुळ निराकरण होणेसाठी अर्जात नमूद केलेले मुद्दे काढणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. नि. ३२ येथे अ.क्र. १ येथे खालीलप्रमाणे मुद्दा काढण्यात येत असून इतर मुद्दयाचे क्रमांक बदलण्यात येत आहेत.

(१) कै. महिपत येसू राणे यांनी त्यांच्या हयातीमध्ये दि. १५/१०/१९९० रोजी दावा मिळकतींबाबत वादीच्या लाभात मृत्यूपत्र केले होते असे वादी शाबीत करतो काय ?

३. वादी प्रतिवादी यांनी याची नोंद घ्यावी.

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिनांक : २०/०३/२०२४. दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.